# भारतीय संविधान

## समजून घेताना...



संपादक

प्रा. डॉ. [illegible]र्जेराव [illegible]

[illegible]

# अनुक्रम...

संपादकीय...

भारतीय संविधान आणि मूलभूत अधिकार
प्रा. निलम पाटील / ११

भारतीय संविधान : एकता आणि एकात्मता
प्रा. डॉ. शिवाजीराव पाटील / १७

भारतीय संविधान : एक लोकशाहीचा दस्तऐवज
प्रा. डॉ. आर. डी. कांबळे / २३

संविधानिक न्यायाचे तत्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील
डॉ. आंबेडकरांची भूमिका
प्रा. डॉ. सोमनाथ डी. कदम / २७

भारतीय राज्यघटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान
प्रा. डॉ. के. एस. काळे / ३५

भारतीय संविधान आणि हक्कांची ओळख
सौ. मंजिरी महेश कुलकर्णी / ४३

डॉ. बाबासाहेब आंबेडकरआणि संविधान
डॉ. सुनील चंदनशिवे / ५८

भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षता
प्रा. एस. एन. पाटील / ६२

भारतीय राज्यघटनेची जडणघडण
डॉ. जे. पी. पाटील / 67

**डॉ. सिंधू जयवंत आवळे**
एम.ए., पीएच्.डी.
असोशिएट प्रोफेसर, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.
मो. नं. ९७६७२४९९९९

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशामध्ये स्थिर झाले. जोपर्यंत देशाची राज्यघटना तयार होत नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने ते स्वतंत्र म्हणता येत नव्हते. त्या अनुषंगाने देशाची राज्यघटना निर्माण करणे अपरिहार्य ठरले. त्यामुळे डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीफ स्थापन करण्यात आली. तर घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्यासोबत एकूण सहा सदस्य यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे मसुदा समितीमध्ये एकूण ७ सदस्य होते. ही समिती २९ ऑगस्ट १९४७ साली स्थापन झाली. १९४९ अखेर घटनेच्या मसुद्याचे तीनवेळा वाचन करण्यात आले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने भारताची राज्यघटना स्विकृत केली. मसुदा संविधानाची मंजुरी झाली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेमध्ये १ प्रस्तावना, ३९५ आर्टिकल्स, ८ शेड्यूल्ड समाविष्ट करण्यात आली होती. जगातील सर्वात मोठी व लिखित अशी भारताची राज्यघटना आहे.

घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने भारताचे नवे राष्ट्र निर्मितीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खूप मोठे बौद्धिक कष्ट घेतले व जात, धर्म, पंथ, भाषा व लिंगभेदाच्या पलिकडे जाऊन सामाजिक समतेवर आधारित सर्व जनकल्याणकारी अशा संविधानाची निर्मिती केली. भारतीय संविधान हे आपल्या राष्ट्र जीवनाचा गाभा, पाया आहे. भारतीय संविधानाचा प्रत्येक अनुच्छेद मानवी मूल्यांनी ओतप्रोत भरलेला आहे. यात भारतीय संविधानाची उद्देशिका, मुलभूत अधिकार, मुलभूत कर्तव्ये, मार्गदर्शक तत्त्वे, संघराज्य, निवडणूका, अनुसूचित जाती-जमाती व अन्य मागासवर्गीय इ. विविक्षित वर्गासाठी विशेष तरतुदी, भाषा, आणिबाणी असे विभाग आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी घटनेची अंमलबजावणी केली आणि १५ ऑगस्ट १९४७ साली ब्रिटीशांच्या शृंखलेतून मुक्त झालेला भारत देश २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आले. अशा स्वतंत्र राष्ट्राची ओळख राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज व राष्ट्रीय चिन्ह आणि भाषा या प्रतिकांतून होत असते. ती स्वतंत्र राष्ट्राची/देशाची प्रतीके असतात. त्यामुळे स्वतंत्र भारताची ओळख जगाला होण्यासाठी भारत देशाची प्रतीके यांना घटनेने/संविधानाने मान्यता दिली त्याचा सविस्तर विचार पुढीलप्रमाणे करूया :

**भारत देशाची प्रतीके :**

**राष्ट्रगीत**

-२४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीने स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत म्हणून 'जन-गण-मन अधिनायक जय हे' स्वीकारून २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेची अंमलबजावणी केली. तत्पूर्वी भारतीय राष्ट्रीय चळवळीची स्थापना १८८५ साली झाली. तद्नंतर २६ वर्षे ब्रिटिश सत्तेविरूद्ध स्वातंत्र्याचा लढा सुरू असताना २७ डिसेंबर १९११ रोजी प्रथम राष्ट्रगीत म्हंटले गेले होते. त्यावेळी कलकत्ता येथे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन संपन्न झाले.

राज्यघटनेची अंमलबजावणी झाली. त्या दिवसापासून स्वातंत्र्य दिवस, प्रजासत्ताक दिन, घटक राज्याच्या स्थापनादिनी राष्ट्रगीत सामूहिकरित्या म्हटले जाते. नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी या राष्ट्रगीताची रचना केली आहे. पूर्ण राष्ट्रगीत म्हणण्यासाठी ५२ सेकंद लागतात. संक्षिप्त राष्ट्रगीत म्हणण्यासाठी २० सेकंद लागतात. राष्ट्रध्वजाला सलामी देताना राष्ट्रगीत म्हणण्याची प्रथा आहे. शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक कार्यक्रम, व्याख्याने, राजकीय, सामाजिक, इतर संघटनांच्या सभा इत्यादी प्रसंगी राष्ट्रगीत म्हंटले जाते. कोणत्याही कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्याची प्रथा आहे. कधी-कधी कार्यक्रमाच्या प्रारंभाला राष्ट्रगीत म्हंटले जाते. राष्ट्रगीत सुरू होताच सर्व भारतीय नागरिक जेथे असतील तेथे राष्ट्रगीत संपेपर्यंत उभे राहून राष्ट्रगीताचा मान राखताना दिसतात. या कृतीतून देशाप्रती असणारा आदर, प्रेम, देशभक्ती स्पष्ट होते.

**राष्ट्रध्वज (तिरंगा झेंडा) :**

भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा झेंडा हा प्रत्येक भारतीय नागरिकाला परिचित आहे. प्रत्येक नागरिक राष्ट्रध्वजाचा मान, सन्मान राखताना दिसतो. तिरंगा झेंडा राष्ट्रध्वजाच्या रूपाने कसा विकसित झाला. त्याला एक इतिहास आहे. त्याग, सत्य, शांती आणि समृद्धीचे प्रतीक असणारा हा तिरंगा सर्व भारतीयांचे आदराचे द्योतक आहे.

मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात मादाम कामा या देशप्रेमी भारतीय महिलेने भारताचे निशाण म्हणून झेंडा फडकविला. हा झेंडा त्यांनी संकल्पनेने केला होता. हा झेंडा गडद भगवा, पांढरा व हिरवा या रंगाचे आडवे पट्टे व मध्ये २४ आरे असणारे अशोकचक्र असा होता. त्यानंतर सन १९१६ मध्ये ॲनी बेझंट यांनी तुरूंगात असताना ४ हिरवे, केसरी व ५ तांबडे असे आडवे पट्टे व त्यावर वरच्या डाव्या कोपऱ्यात युनियन जॅक, त्याखाली ७ तारे व उजवीकडे चंद्र आणि कमळाची आठ चित्रे असणारा झेंडा फडकविला होता.

सन १९२१ पासून तिरंगा झेंड्याचा आकार व विचार अधिक स्पष्ट होत गेला. महात्मा गांधीजींच्या सुचनेनुसार मच्छलीपट्टणम येथील प्रा.श्री.व्यंकय्या यांनी तांबडा, हिरवा, पांढरा, रंगाचा आडवा पट्टा तयार केला व जालंधरचे लाला हंसराज यांनी त्यावर निळा चरखा तयार करून झेंड्यास नवीन रूप दिले. सन १९३१ मध्ये केसरी, पांढरा, हिरवा हे रंग धर्मद्योतक नाहीत तर ते त्याग, धैर्य, शांतता, प्रेम व विश्वास या गुणांची प्रतीके आहेत असे राष्ट्रीय चळवळीने जाहीर केले. असे हे तिरंगा झेंड्याचे स्वरूप बदलत दि.२२ जुलै १९४७ रोजी स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी २४ दिवस तिरंग्याचा राष्ट्रध्वज म्हणून अंगिकार करण्यात आला. तिरंग्यातील केसरी रंग स्वार्थनिरपेक्ष त्याग, पांढरा रंग सत्याचा मार्ग व हिरवा रंग मनुष्याचे वनस्पती जीवनाशी असणारे नाते तर तिरंग्याच्या मध्यभागी पांढऱ्या रंगावर असलेले अशोकचक्र हे धर्मनियमाचे नियंत्रक व गतिदर्शक आहे आणि शांततापूर्ण परिवर्तनाचे द्योतक आहे असे संविधान सभेमध्ये डॉ.एस.राधाकृष्णन यांनी तिरंग्यातील रंग व चक्राच्या अर्थसूचकतेचे वर्णन केले आहे.

हा तिरंगा झेंडा समान रूंदीच्या आयताकृती कापडी पट्टया मिळून बनलेला आहे. सर्वात वर केशरी रंगाची पट्टी, मधली पट्टी पांढऱ्या रंगाची, खालची पट्टी हिरव्या रंगाची व पांढऱ्या रंगाच्या पट्टीवर मध्यभागी समान अंतराच्या २४ आऱ्यांचे नेव्ही ब्ल्यू रंगाचे अशोक चक्राचे चिन्ह आहे.

हा राष्ट्रध्वज वापरावर काही नियम आहेत. हा राष्ट्रध्वज गणवेश, पोशाख किंवा हात रूमाल म्हणून वापरता येत नाही. खाजगी अंत्यसंस्कार प्रसंगी व इतर कोणत्याही प्रकारचे आच्छादन म्हणून वापरता येत नाही. या ध्वजाचा वापर व्यापार व्यवसाय करण्यासाठी करता येत नाही. राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही याची काळजी प्रत्येक भारतीयाने घेणे बंधनकारक आहे.

**राष्ट्रीय बोधचिन्ह**

सारनाथ येथील म्युझि
याची प्रतिकृती राष्ट्रीय बोधचिन्
अहिंसेचा मार्ग स्वीकारून, बौद्ध
सम्राट अशोकाचा शांततेचा मा

बोधचिन्हामध्ये समोर
टेकवून बसलेले चार सिंह अ
बाजूला गोलाकृती चक्रात बैल
व त्यांचे खालच्या बाजूस सत्य
हा सत्य मार्गाचाच आहे असा

राष्ट्रीय बोधचिन्ह का
कामाकाजामध्ये अधिकृत काग
अन्य कोणास याचा वापर करत
तर ५०००/- रूपये दंड व सह
वापर सरकारी अधिकाऱ्यांव्यति
आमदार, खासदार, मंत्री, पंतप्र
इत्यादींना गाडीवर हे बोधचिन्ह
ज्यांना मिळाला आहे त्यांनी 'स
भ्रष्ट बनू नये, सत्तेचा दुरूपयोग
असावा हे सूचविते.

**राष्ट्रभाषा हिंदी :**

भाषा ही मानवाच्या
असते. भाषेमुळे संस्कृतीचे स
भाषेची गरज असते. भाषा
माणसा-माणसातील मनोगत,
आहे. भारत हा देश विविध
राज्यांनी मिळून बनलेले आहे
आहे व स्वतंत्र आहे. ती त्या
लोकांना हिंदी भाषा बोलता
यामुळेच हिंदी भाषा ही राष्ट्रा

हिंदी भाषा ही केंद्र सरकारची कार्यालयीन भाषा असेल असे ठरविण्यात आले. त्यावेळी इंग्रजीसह इतर अन्य भाषेची सांगोपांग चर्चा झाली. पण अंतिमत: बहुतांश लोकांना हिंदी समजण्यास, बोलण्यास सोपी वाटते म्हणून राज्यघटना समितीचे अध्यक्ष मा.राजेंद्रप्रसाद यांनी हिंदी भाषा केंद्रीय कामकाजाची असेल असे सांगितले तो दिवस होता १४ सप्टेंबर म्हणून आजही आपण १४ सप्टेंबर हा दिवस 'हिंदी दिवस' म्हणून संपूर्ण देशभर साजरा करण्यात येतो.

**समारोप :**

२६ जानेवारी १९५० रोजी घटनेची अंमलबजावणी करण्यात आली. स्वतंत्र भारताची ओळख राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, राष्ट्रीय बोधचिन्ह आणि राष्ट्रभाषा या देशाच्या प्रतीकांनी जगाला झाली. या भारत देशाच्या प्रतीकांचा सर्व भारतीय नागरिकांनी मान, आदर करावा. त्यातून त्यांची देशभक्ती प्रतीत होताना दिसते. भारतीय संविधानाने या सर्व प्रतिकांना सर्व भारतीयांच्या जीवनात आगळेवेगळे स्थान निर्माण करून दिले आहे हे निश्चित.

**संदर्भ :**

१) भारताचे संविधान - (९४ व्या सुधारणेपर्यंत अद्ययावत) (२६ सप्टेंबर २००६ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे) भाषा संचालनाद्वारे अनुवादित आणि संचालक शासनमुद्रण व लेखन सामुग्री महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित प्रकाशित ६ वी आवृत्ती २००६.

२) संविधान आणि भारतीय समाज - अवघडे भगवान, प्रकाशक - लोकायन सहकारी प्रकाशन संस्था, सातारा, प्रथम आवृत्ती, १ मे २०१८.

साम

संशोध

प्रस्तावना

अगदी प्राची
आहे. स्वातंत्र्य, समत
गतिमान व बदलणारी
प्लेटो (The Republ
स्पष्ट केली आहे. न्या
न्याय असे प्रकार पड
प्राचीन काळापासून व्य
वरिष्ठ, उच्च जातीच्या
होऊ लागले. विशिष्ट
स्वातंत्र्य उपभोगता येई
वंचित ठेवले जाईल अ
जातीच्या लोकांकडून
समाजात वर्णव्यवस्था
झाले. तत्कालीन व्यव
लागत होती. त्यांना
घटकांच्या आधारावर
निर्माण झाली. सामा
लोकांना सामाजिक न
ब्राह्मणेत्तर संघर्ष सुरू झ
त्यांना सामाजिक गुला
भारतीय राज्यघटनेचे शि
लढा दिला असून त्या
**सामाजिक न्याय :** भार
शिडीसारखी होती. व